प्रबोधन

# पाळीव जनावराच्या मृतदेहाची विल्हेवाट शास्त्रीय पद्धतीने लावली पाहिजे



**डॉ. शांती लाहोटी**
(मो.नं. ९४२१३७५२८५)
परळी वैजनाथ, जि. बीड

**जनावराच्या मृतदेहाची विल्हेवाट लावताना योग्य काळजी घेतली तर, पशू ज्या एखाद्या संसर्गजन्य रोगाने मरण पावला असेल त्या रोगजंतूंचा व रोगाचा प्रसार थांबवता येतो. ते जनावरांच्या व माणसांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असते.**

**पू**र्वी पशू मरण पावला की त्याचे शव गावाबाहेर उघड्यावर अक्षरशः फेकून देत. घार, गिधाड हे जंगली पक्षी, कोल्हे, लांडगे, कुत्री व रानटी प्राणी भक्षण करून त्याची विल्हेवाट लावीत. पण आजच्या काळात रानटी पक्षी व प्राण्यांची संख्या एकदम रोडावली असल्याने फेकलेल्या पशूची विल्हेवाट फक्त कुत्र्यांद्वारेच होते, जे गावातील वातावरण दूषित करण्यास व रोगांचा प्रसार करण्यास कारणीभूत होऊ शकतात.

जनावराचा मृतदेह उघड्यावर फेकल्यास त्या मृतदेहावर असलेल्या जिवाणू व विषाणूंची वाढ होऊन काही तासांतच ते सडण्यास सुरुवात होते. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते. तसेच या मृतदेहावर इतर रोगजंतूंची वाढ होऊ शकते. हे रोगजंतू हवा, पाणी, कुत्री तसेच पक्ष्यांद्वारे इतरत्र पसरून त्याचा प्रादुर्भाव इतर जनावरांना व माणसांना होऊन रोग होण्याची शक्यता अधिक असते. मृतदेह नष्ट झाल्यावरही त्यावर असलेले रोगजंतू बरेच दिवस वातावरणात जिवंत राहून आजूबाजूचे वातावरण दूषित करतात. काही जिवाणू पशुधनाच्या मृत्यूनंतर कोष तयार करून वर्षानुवर्षे जिवंत राहू शकतात, त्यामुळे तो आजार काही वर्षानंतर पुन्हा उद्भवू शकतो. याकरिता मृतदेहाची योग्य विल्हेवाट लावणे म्हणजे मृतदेहावर अंत्यसंस्कार करणे आवश्यक आहे. मृतदेह विल्हेवाटीसाठी खालील पद्धतींचा अवलंब करता येईल.

१) **दफन (जमिनीत पुरून)** : पशूच्या मृत्यूनंतर किमान २ मीटर खोल खड्डा खणून कातडीसह अथवा कातडी कमवून पुरले जाते. जनावरास संसर्गजन्य रोग असल्यास कातडीसह पुरले जाते. संसर्गजन्य रोग नसल्यास कातडी काढून पुरले जाते. खड्ड्यात मृतदेहाच्या आजूबाजूला व वर मीठ, चुना, निर्जंतुकीकरण करणारी द्रव्ये टाकावीत. खड्डा मातीने पूर्ण बुजवावा. नंतर वर काटे/ काटी ठेवावी. मोठे दगड ठेवावे जेणेकरून किमान वर्षभर कुत्री, रानटी श्वापदांना मृतदेह उकरता येणार नाही. परंतु दफनाने भूजल प्रदूषण देखील होऊ शकते.

२) **दहन** : मृत जनावराला लांब नेऊन जाळणे हा एक उत्तम पर्याय आहे. अग्निदाहामुळे पुन्हा संसर्गाचा धोका नाही. या पद्धतीत मृत जनावराचे राखेत रुपांतर होते. पण दहन आर्थिकदृष्ट्या फार महाग पडते. कारण दहनासाठी इंधन/ लाकूड अथवा मृतदेह जाळण्यासाठी मुद्दाम बनवलेले दाहिनी यंत्र वापरले जाते. दाहिनी यंत्रात मृतदेह हा १३०० डिग्री सेल्सिअस तापमानावर जाळला जातो. जाळण्यासाठी लाकूडफाटा लागणार, म्हणजे वृक्षतोड करावी लागेल. वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होतो. तसेच धूर आदींमुळे हवा दूषित होऊ शकते.

३) **वाफ** : अतिशय गरम वाफ देऊन जनावराची कातडी व मांस यांचे विघटन केले जाते. मोठ्या कत्तलखान्यात कातडी बाजूला काढण्यासाठी ही पद्धत वापरली जाते.

४) **रसायने** : विशिष्ट रासायनिक पदार्थांचा उपयोग करून जनावराची कातडी, मांस, हाडे विरघळून जातात. पण हे फार खर्चिक आहे.

**विल्हेवाट लावताना घ्यावयाची काळजी**

जनावराच्या मृतदेहाची विल्हेवाट लावताना योग्य

काळजी घेतली तर, पशू ज्या एखाद्या संसर्गजन्य रोगाने मरण पावला असेल त्या रोगजंतूंचा व रोगाचा प्रसार थांबवता येतो. ते आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते.

१) मृतदेहाची विल्हेवाट लावलेल्या ठिकाणी किंवा आसपास काही दिवस जनावरे चरावयास नेऊ नयेत. २) जनावर ज्या ठिकाणी मेले त्या ठिकाणावरील मल, मूत्र, चारा इत्यादी तसेच जनावराची वापरलेली भांडी खरडून काढून सोड्याने स्वच्छ करून फिनाईलने साफ करावी. ३) आजूबाजूला जाळ/ अग्नि प्रज्वलित करून भिंतीमधील, गव्हाणीमधील भेगा जाळून घ्याव्यात, जेणेकरून रोगजंतू लपून बसले असतील तर त्यांचा नायनाट होईल. ४) मृतदेह वाहून नेलेले वाहनसुद्धा सोडा/ फिनाईलने धुवून निर्जंतुकीकरण करावे. ५) मृतदेहाच्या संपर्कात आलेल्या लोकांनी स्वच्छ आंघोळ करून वापरलेले कपडे स्वच्छ धुवावेत. ६) पिसाळलेल्या (रेबिज) मृत जनावराच्या शरीरात मृत्यूनंतरही रेबिजचे विषाणू जिवंत राहतात. अशा वेळी उघड्यावरच्या मृतदेहाला कुत्र्याने खाल्ल्यास कुत्र्यास रेबिजचा संसर्ग होण्याचा धोका वाढतो.

जनावर हे कोणत्याही कारणाने मृत झाले तर ते पशुपालकास नुकसानदायी तसेच क्लेशदायक असते. जनावर वृद्धावस्थेत मरण पावले तर पशुपालक त्या मृतदेहाची विल्हेवाट लावतो. पण जर मृत्यू संशयास्पद असेल तर मृत्यूनंतर त्याच्या मृत्यूचे कारण शोधण्यासाठी मृतदेहाची चिरफाड व विच्छेदन करून निरीक्षण केले जाते.

**शवविच्छेदनाचे उद्देश**

१) जनावर कोणत्या कारणाने मरण पावले हे लक्षात येते. २) मेलेले जनावर कोणत्या रोगाने (जिवाणूजन्य, विषाणुजन्य, परजिवी, बुरशीजन्य किंवा विषबाधा) अथवा अन्य एखाद्या कारणाने मरण पावले हे कळले, तर त्याच कारणाने दुसरे पशुधन मरण पावणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करून भविष्यात होणारे नुकसान टाळता येते. ३) याचा आपल्याकडील किंवा परिसरात असलेले पशुधन वाचविण्यासाठी उपयोग होतो. ४) मृत जनावरात बरेच रोग संसर्गजन्य रोग असू शकतात. ते इतर जनावरांत पसरू शकतात. हे संक्रमण टाळता येते. ५) काही रोग पशूंपासून माणसांनाही होतात. त्यांचाही प्रतिबंध आपल्याला वेळीच करता येतो. संशोधनाद्वारे जनावराच्या मृत्यूची कारणे खालीलप्रमाणे होय.

१) परोपजिवीजन्य रोग (गोचिड, कृमी इ.)- २०- २५ % २) जिवाणूजन्य रोग (घटसर्प, फऱ्या इ.) २०- २५ % ३) विषाणूजन्य रोग (लाळ्या खुरकत इ.) ५- १०% ४) अपघाती मृत्यू (सर्पदंश, मार लागणे) ५- १० % ५)विषबाधा (किरळ, रासायनिक विषबाधा) ५- १० % ६)नैसर्गिक वयोमानानुसार ५- १० % ७) इतर कारणे १०-१५ %

मानवी शवापेक्षा पशूचे शव फार उपयोगी असते. मनुष्याच्या मृत्युनंतर भावनिक कारणामुळे शवविच्छेदन करता येत नाही. (कायदेशीर प्रक्रियेने अनिवार्य नसलेल्या परिस्थितीत ते करण्याचे कारणही नसते.) त्यामुळे त्याच्या मृत्यूचे खरे कारण शोधण्यापासून आपण वंचित राहतो. परंतु जनावराच्या शवाचे परीक्षण करण्यास शक्यतो कोणीही आक्षेप घेत नाही. त्यामुळे पशुवैद्यक परीक्षण अगदी सहजरित्या करू शकतो. त्यामुळे इतर रोगग्रस्त किंमती जनावरांचे प्राण वाचवून संभाव्य नुकसान टाळता येते. पशूच्या शवपरीक्षणानंतर योग्य त्या प्रक्रियेद्वारे खालील उत्पन्न मिळू शकते.

१) कातडी : जनावराच्या मृत्यूनंतर त्याची कातडी कमावता येते. सर्वसाधारण मोठ्या जनावरापासून २००-३०० रुपयांचे तर लहान जनावरापासून ५०-१०० रुपयांपर्यंत कातडीचे मूल्य मिळू शकते.

२) केस : शेपटीच्या केसांचा उपयोग ब्रश तसेच दोर तयार करण्यासाठी होतो. या केसांना बाजारात चांगली मागणी आहे.

३) शिंगे व खुरे : शिंगांपासून शोभेच्या वस्तू, कंगवे, बटण, हेअरपिन इत्यादी तर खुरांपासून शिरस तयार होतो. शिंग व खुरांचे बाजारमूल्य ५०-६० रुपयांचे होते.

४) आतडी : न कुजलेल्या आतडीपासून दोर, बॅडमिंटन रॅकेटच्या गटिंगसाठी वापरता येणारा दोरा बनवता येत असल्याने बाजारात त्याला मागणी आहे.

५) चरबी : दोन ते तीन किलो चरबी एका जनावरापासून मिळते. चरबीचा भाव सर्वसाधारण २० रुपये किलो असतो.

६) हाडे : हाडांचा उपयोग खत म्हणून होतो. एका जनावरापासून १२-१५ किलो हाडे उपलब्ध होतात. हाडाचे बाजारमूल्य ४-५ रुपये प्रतिकिलो मिळते.

७) मांस : मांस भुकटी व मांस चुरा कोंबडी खाद्यात वापरला जातो. तसेच याचा वापर कुत्र्यांसाठी प्रथिनयुक्त बिस्किटे बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. एका जनावरापासून २०-३० किलो मांस चुरा मिळतो. मांस चुऱ्याची किंमत ५-८ रुपये प्रतिकिलो मिळते. अशा पद्धतीने जनावराच्या मृत्यूनंतर त्याच्या विविध भागांचा उपयोग केल्याने प्रदूषण होणार नाही, तसेच मृतदेहापासून १०००-१२०० रुपयांचे उत्पन्न प्राप्त होईल. ■